म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ग्रा० वा०
दा. क्र. ८०९८

IRBK-0108017
IRBK-0108017

बालसाहित्य प्रकाशन २२ वे

# बांसरी

लेखक—अनंत मराठे

प्रस्ताव—गोपिनाथ तळवलकर

IRBK-0108017

१० डिसेंबर १९५७] [ किमत सहा आणे

— एकमेव विक्रेते —
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनिवार, पुणें २.

—प्र का शि का—
सौ. सुमति कुलकर्णी
४४० शनवार, पुणें २.

— मु द्र क —
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
४३९ शनिवार, पुणें २.

[ सर्व हक्क सुरक्षित ]

— मु ख पृ ष्ठ —
चित्रकार मुळगांवकर

२८०३७
का. ५।
२०११२
दि. ११।...

# प्रस्ताव

माझे युवक मित्र चि. अनन्त मराठे यांच्या या चिमुकुल्या संग्रहाला प्रस्ताव म्हणून दोन शब्द जोडतांना मला फार आनंद होत आहे. अनन्त मराठे यांच्या आठवणीचा जन्म झाला नसेल तेव्हांपासून त्यांना मी ओळखत आहे. रुपेरी पडद्यावर अभिनय व संगीत या दोनही कलांचा विलास दाखवून ते थोड्याच अवधींत नांवारूपाला चढले. त्यांच्या चढत्यावाढत्या उत्कर्षाच्या लाटा पाहून मला नेहमीच धन्यता वाटते. आज बालवाङ्मयाच्या क्षेत्रांत ते उतरले आहेत. या पुस्तकांतल्या पांच कथापैकीं बहुतेक कथा इंग्रजी जाणणारांच्या परिचयाच्या असतील. पण परदेशी कथावस्तूंवर श्री. मराठे यांनीं चढविलेला स्वदेशी पेहेराव फार सुंदर आहे, आणि त्यामुळेच मूळ कथा ठाऊक असणारांनाहि हें पुस्तक वाचावेंसें वाटेल. लहान मुलांना तर सर्वच नावीन्य व मनोरजकता आढळेल. अशा कल्पनारम्य गोष्टींनीं लहान मुलामुलींची कल्पकता वाढण्यास मदत होते. आपल्या धाकट्या भावंडास सायंवातीच्या प्रकाशांत मोठी बहीण किंवा भाऊ ज्या जिव्हाळयानें व सुबोधपणें गोष्टी सांगतो त्या जिव्हाळयानें व सोपेपणानें श्री. मराठे यांनीं या गोष्टी सांगितल्या आहेत. 'गोकुळां'तील 'बांसरी'च्या सुरांप्रमाणें या पुस्तकांतील शब्द बालवाचकांना वेड लावतील अशी मला खात्री वाटते.

आनंद कार्यालय,
पुणें. २
७-१२-४८

गोपीनाथ तळवलकर

## आमचीं आगामी
## बालसाहित्य प्रकाशनें

सुहासिनी—मा. गो. काटकर
इंद्रधनुष्याची गोष्ट—मनमोहन
तालपुष्कर—शान्ता ज. शेळके M. A.
आई, मला दूध हवंय्—वि. वि. बोकील

**कुलकर्णी ग्रंथागार पुणें २.**

# निष्पाप मुलं



बागेंत फुलें फळें नाहींत तर ती बाग कसली ? आकाशांत सूर्य, चंद्र, तारे नाहींत तर तें आकाश, आकाश नव्हे ! तसेंच घरांत चूल आणि मूल नाहींत व त्यांची जोपासना करायला आई-वडील किंवा बाई माणूस नाहीं तर त्या घराची शोभा ती काय ! ! !

आमच्या, मन्या, चिंगीला सुद्धां आओ-वडील नव्हते. वडीलांनीं सर्व पैसा आपल्या भावाच्या नांवें केला आणि आपली लहान लहान मुलें त्यांच्याच हवाली करून प्राण सोडले. मन्या चिंगीचे काका फार प्रेमळ होते. मुलांना कांहीं देखील कमी पडूं देत नसत. पण पैसा कोणाला बरं स्वस्थ बसूं देईल ? त्यांना राहून राहून वाटे उद्यां मन्या चिंगी मोठी होतील त्यांचं शिक्षण, लग्न घरदार सर्व कांहीं आपल्यालाच करावं लागणार मग आपल्याला त्या पैशांची मजा कशी बरं चाखायला मिळेल. मुलं आतां लहान आहेत, अजाण आहेत तोंच त्यांना मारून टाकूंया ! हा विचार मनीं येतांच काकासाहेब अस्वस्थ झाले. त्यांना चैन पडेना काय करावं तें सुचेना पण शेवटीं जिवाचा निर्धार करून त्यांनीं तोंच विचार कायम केला. ताबडतोब दोन मारेकऱ्यांना बोलाविले. त्यांना मनपसंत पैसे दिले व सांगितले; "मी या मुलांना तुमच्याबरोबर पाठवीत आहे, दूर अशा अरण्यांत पोहचतांच त्यांना मारून टाका." मुलांबरोबर घराबाहेर

पाऊल ठेवतांच मारेकऱ्यांचा आनंद गगनांत मावेना. पैशांची रास त्यांचे डोळयापुढें दिसूं लागली, नाचूं लागली. आतां वाटेवरील अडगळ दूर झाली.

मन्या चिंगीला वाटलं आपण किती तरी दिवसांनीं काकांच्या दोन मित्रांबरोबर लांबलांब फिरायला जाणार तिथं गंमत जमंत करणार, खेळणार आणि काय काय करणार ? या आनंदाचे भरांत तीं दोघें मोठ्या मजेंत त्या भयंकर अशा अरण्यांत येऊन पोंहचलीं. मारेकऱ्यांपैकीं एकानें मारण्याचे नाकारलें व मुलांना त्या भकास जागीं ठेऊन ते मांग तसेच चालते झाले. पैसा परी पैसा मिळाला आणि त्रासही वाचला. मन्या चिंगी त्यांना जोरानें हांका मारूं लागले. ओरडूं लागले आणि रडूंही लागले पण जिकडे पहावें तिकडे मोठ मोठीं झाडें, फळें, फुलें, पानें, निरनिराळें रंगीबेरंगी पक्षीं, चिमुकले ससे, हरणें, यापलिकडे तिथं काय होतं. कोण त्यांची दाद घेणार ? त्यांना तहान लागली, भूक लागली, रडून रडून प्राण कंठाशीं आलें. गळयांत गळे घालून ते एकमेकांची समजूत करूं लागले. मन्या चिंगीला रडत रडत म्हणाला, " रडूं नकोस हं, आतां काका येतील मग दूधू देतील. " तशी चिंगी हुंदके देत देत म्हणाली, " मी, मी कुठं ललते. मी तल हत्तेय. बघ किती जोलजोलनं हत्तेय ! तूं हच बघूं ? " त्या कोवळ्या जिवांना हंसायला कां येत होतं ? त्या भयंकर अरण्यांत कुठं जावं ? काय करावं? कांहींच सुचेना त्यांना ? शेवटीं त्यांनीं एकमेकांना घट्ट मिठी



“ मी, मी कुठं ललते. मी तल हत्तेय. बघ किती जोलजोलानं हत्तेय ! त्ं हत बघूं ? ”

मारली आणि, आणि बेशुद्ध अवस्थेंतच सूर्यास्ताबरोबर त्यांनीं मरणाकडे धांव घेतली.

थोड्या वेळानं तिथं कोण कोण होतं माहीत आहे तुम्हांला पाना फुलांनीं आपल्या लाडक्या मन्या आणि चिंगीचीं अंगं झांकलीं होतीं, झाडं वांकलीं गेलीं होतीं, रंगीबेरंगी पक्षी व ससे ढळाढळ रडत होते, हरणें हळूंच झाडाअडून टक टक पहात होतीं. नुकताच चंद्रोदय झाला होता, वारा झुळझुळ वहात होता, रातकिड्यांची किरकिर चालू होती आणि इतक्यांत दोन तारे भरधांव वेगानें त्या अरण्यांतील कुठल्या तरी कानाकोपऱ्यांत पडलें असावेत असा अंधुक भास झाला.

**स्वार्थामुळं निष्पाप मुलांनासुद्धां अशीं फळं भोगावीं लागतात !**

* * *

## देवाची देणगी

गोष्ट दुसरी

एक विधवा बाई होती. तिला सर्वजण काकू म्हणत. काकूंना एक मुलगा होता. त्याचं नांव गोपाळ. त्याच्या घरीं एक गाय होती. तिचं नांव बहुला होतं. काकू स्वभावानं गरीब होत्या पण परिस्थितीनें लाचार होत्या. नवऱ्यानें ठेवलेला पैसा किती दिवस पुरणार ! गोपू हुशार होपताण, लहान होता. त्याला कोण नोकरी देणार ?

घरांत धान्याचा एक कण नाहीं कीं पाण्याचा थेंब नाहीं अशी त्यांची स्थिती ! शेवटीं या भयंकर परिस्थितीमुळें काकूंना नको तो विचार करणं भाग पडलं. जिवाचा निर्धार करून ती लाडकी गाय, ती गोजिरवाणी बहुला भर बाजारांत विकायचं ठरवलं त्यांनीं. आठ पंधरा दिवस तरी पोटाची आग शांत झाली असती ! गोपू गाय घेऊन घराबाहेर निघाला. त्याला वाटेंत एक माणूस भेटला. त्यानं ती गाय वालाचं बी देऊन खरेदी केली. गोपू वालाचं बी घेऊन घरीं आला. काकू त्याच्यावर खूप खूप रागावल्या. वालाचं बी देऊन खायला कोण देणार ? रागाच्या भरांत त्यांनीं तें वालाचं बी बाहेर फेंकून दिलं. आणि काय त्याची भयंकर उंच वेल उगवली ! गोपूला रहावेना. तो आनंदानें त्याच्यावर भराभर चढून गेला. कांहीं वेळानं वर पोहचतांच त्याला राक्षसाचा किल्ला दिसला. तो हळू हळू किल्ल्यांत गेला. राक्षसाच्या बायकोनें त्याला पाहिलें व ताबडतोब एका ठिकाणीं लपविलें. कारण ती जातीनं जरी राक्षसी होती तरी वृत्तीनं मुळींच नव्हती. कांहीं माणसं दिसायलं जरी क्रुर असलीं तरी तीं फार प्रेमळ असतात बरं कां ? तसंच इथं होतं. गोपू हळूच खिडकींतून पाहूं लागला. तों काय ? राक्षस महाराज त्या भल्या मोठ्या दिवाणखान्यांत एका सिंहासनावर बसले होते. त्यांच्याजवळ पुष्कळ पैशांच्या पिशव्या होत्या, एका बाजूला भली मोठी सोनें चांदी हिरे, मोतीं, रुपें यांची रास पडली होती, समोरच्या कोपऱ्यांत एक सोन्याची अंडीं देणारी कोंबडी होती. तिच्या बाजूला एक

सुंदर वाद्य होतं. तें स्वत: वाजत असे. हें सर्व पाहून गोपूचे डोळे दिपून गेले! आपण कुठें आहोत? कांहींच समजेना. रात्र होताच राक्षसमहाराज जेव्हां झोंपी गेले, तेव्हां गोपू हलक्या पावलानें दिवाणखान्यांत शिरला आणि त्यानें सोन्याची अंडीं देणारी कोंबडी घेतली, जादूचें वाद्य घेतलें व जितकें हिरें मोतीं घेतां आले तितके घेऊन तो किल्ल्याबाहेर आला व सरसर वेल उतरूं लागला, इतक्यांत कशानें तरी राक्षसाला जाग आली व तोही भरभर वेल उतरूं लागला. गोपूनें राक्षसाला पाहिलें आणि त्याची गाळण उडाली पण ताबडतोब एक नामी युक्ति त्याला सुचली. त्यानें ती वेल तोडून टाकली. वेल तुटतांच राक्षस धाडकन् खालीं पडून मरण पावला! कांहीं वेळानें गोपू जमिनीवर उतरतांच धांवत धांवत घरांत गेला. प्रेमानें आपल्या आईला त्यानें मिठी मारली आणि सर्व गंमत सांगितली. काकूंना फार आनंद झाला व नंतर ती सुखानं राहूं लागली! हें काय सांगायला पाहिजे?

**भाग्याचा दिवस सांगून येत नसतो तो आपोआपच येतो.**

* * *

२९९३४
बांसरी
...माध्यमिक ग्रंथ
क्रमांक २८१३
गोष्ट तिसरी
११/८/६०

# घिटाई खाई मिठाई

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे बरं कां?

एक चिनी मुलगा होता. त्याचें नांव अल्लाउद्दिन होतें. त्याला वडिल नव्हते; आई मात्र होती, आई स्वभावानें फार चांगली होती. भोळी भावडी आणि परोपकारी वृत्तीची होती पण हे सर्व गुण तिला कधींच उपयोगी पडले नव्हते. नवरा नानातऱ्हेचा व्यसनी होता. बायकोला सुख नाहीं. मुलगा तर एक नंबरचा उनाड होता. आई बिचारी दिवसभर दारोदारीं ( घरोघर ) धुणींभांडीं करी, दळणकाडण करी व कसेंबसें ती मीठभाता पुरतें पैसे मिळवी. अल्लाउद्दिनाला ती रोज सांगत असे, " अल्ला, जा बाळ, कुठें तरी एखादं लहान सहान काम कर. चार पैसे घरीं येतील. पोटाची शांती होईल. मला जें कांहीं धुणीं भांडीं, दळणकांडण करून मिळतं तेवढं किती दिवस पुरणार? तुझा बाप उधळ्या होता. त्यांनीं कधीं सुखाचा घास दिला नाहीं. आतां तूं समजुतदार झाला आहेस. हुशार आहेस. तूं एकदां नीट मार्गाला लागलास म्हणजे मी सुखानें डोळे मिटेन." पण अल्लाउद्दिनानें त्या माऊलीच्या प्रेमळ शब्दाकडे, त्या ममताळू आर्जवाला बिलकूल दाद दिली नाहीं. त्याला दिवसभर ह्याच्याशीं भांड, त्याच्याशीं खोडी कर, दांडगाई कर, गांवभर उनाडक्या कर, या पलिकडे कांहीं उद्योग नसे. घरीं आल्यावर आईला कांहीं बाही मदत नाहीं. लाडानें विचारपूस नाहीं कीं कांहीं नाहीं!

एके दिवशीं फिरतां फिरतां अल्लाउद्दिनाला एक जादुगार भेटला. तो फार लबाड होता. त्याला वाटलं ज्या कामाकरितां आपण इतकें धडपडत होतो तें काम, हा मुलगा नक्की करील. जादुगाराचें हातांत एक सुंदर अंगठी होती. ती घासली असतां एक देखणी परी बाहेर येत असे. तिचें नांव 'आज्ञा' होतें. आज्ञेला कोणतेंही काम सांगितलें असतां तें ती तावडतोब करीत असे. जादुगार अल्लाउद्दिनाला म्हणाला "मुला, ह्या डोंगराचे पायथ्याशीं एक भुयार (गुहा) आहे. भुयारांत एक दिवा आहे. तो मला आणून दिलास तर मी तुला पुष्कळ पैसे देईन हं."

अल्लाउद्दिनाला वाटलें दिवा तो काय? आपण सहज आणूं. पण तो दिवा जादुचा होता. तो घासला असतां एक राक्षस बाहेर येत असे व आज्ञेप्रमाणें वाटेल तें काम क्षणांत करीत असे अल्लाउद्दिनाला फार आनंद झाला. त्यानें लगेच 'हो' म्हटलें. तो विचार करूं लागला, एकदां दिवा जादुगाराला दिला कीं मग काय पैसाच पैसा! मोठा राजवाडा बांधूं! नोकर चाकर ठेवूं! मेजवानी करूं! एवढंच काय पण राज्यकन्येला मागणी सुद्धां घालूं! आणि खरंच आईला तर किती किती आनंद होईल नाहीं!!! असो, जादुगार व अल्लाउद्दिन भुयारापाशीं येऊन पोंहचले. जादुगारानें आपल्या हातांतील आंगठी अल्लाउद्दिनाचे हातांत घातली. भुयाराचे तोंडावरील दार उघडलें व अल्लाउद्दिन हळूंहळूं आंत गेला. जादुगारानें बाहेरून दार बंद केलें व दिव्याची वाट पाहूं लागला. कांहीं वेळानें

भुयारांत शोधतां शोधतां तो सुंदर जादूचा दिवा अल्लाउद्दिनाला मिळाला. मोठ्या आनंदानें उड्या मारीत मारीत तो दाराशीं आला! तो काय? दार बंद! त्यानें जादुगाराला हांक मारली. बाहेरून जादुगार म्हणाला, "तो दिवा अगोदर माझ्या हातांत दे बघूं आणि मग तूं बाहेर ये." जादुगार दिव्यासाठीं हें करतों आहे, तेव्हां दिव्यांत कांहींतरी जादू आहे हें चतुर अल्लाउद्दिनानें ओळखलें आणि आंतून तो म्हणाला, "नाहीं, मी दिवा अगोदर देणार नाहीं. मी बाहेर येतो आणि मग देतो." जादुगारानें त्यांची समजूत करायचा प्रयत्न केला, गोडी गुलाबी केली. शेवटीं दमदाटी दिली. रागावला तरीही तो जाम ऐकेना; तेव्हां दार बंद करून तसाच चरफडत बाहेर उभा राहिला. अल्लाउद्दिन धीट होता. तो आंतच थांबला इतक्यांत त्यांच्या हातांतील आंगठी कपाळाशी घासली गेली; त्याबरोबर 'आज्ञा' बाहेर आली. तो फार घाबरला! 'आज्ञेनें, त्याला धीर दिला. आणि आपण त्याचे नोकर असल्याचें त्याला सांगितलें, त्यानें तिला त्यांच्या घरीं न्यावयास आज्ञा दिली. आणि तो घरीं सुखरूप पोंचला.

दुसऱ्या किंवा तिसऱ्याच दिवशीं अल्लाउद्दिनाच्या आईनें घरांतील अंधार घालवावा म्हणून दिवा घेतला आणि घासला तोंच त्यांतून एक राक्षस बाहेर आला व .आज्ञा मागूं लागला. अल्लाउद्दिन घरांतून धांवत आला व आपल्या सर्व आज्ञा त्याला सांगितल्या. थोड्याच दिवसांनीं त्याचें राजकन्येशीं लग्न सुद्धां झालें. आणि सुखानें कालक्रमणा करूं लागला.

## भीति करती माती म्हणून व्हा धीट व्हा !

इकडे तो जादुगार दिवा मिळाला नाहीं म्हणून वेड्यासारखा वणवण भटकूं लागला. कांहीं दिवसांनीं त्याला अल्लाउद्दिन राजा झाल्याचें समजलें. तावडतोब त्यानें एक युक्ती केली. आपण दिवे विकणाऱ्या फेरीवाल्याचें सोंग घेऊन राजवाड्यापाशीं आला व ओरडूं लागला, "जुने दिवे द्या, नवे दिवे घ्या, जुनें द्या, नवे घ्या" राजवाड्यांतील एका दासीनें हें ओरडणें ऐकलें. तो जादूचा दिवा तिला एका कोपऱ्यांत ठेवलेला दिसला. दिव्यावर थोडी धूळ सांचल्याचें दिसलें तेव्हां लगेच तो दिवा जादुगाराला (फेरीवाल्याला) देऊन दुसरा नवा दिवा घेतला. जादुगाराला तो दिवा हातांत पडतांच काय करावं नि काय करूं नये असें झालें. एका क्षणांत प्रथम राणीला चोरून तो पळूं लागला. पाठोपाठ अल्लाउद्दिनही मोठ्या रागानें पाठलाग करूं लगला. अल्लाउद्दिन फार शूर होता. जादुगाराला राणीबरोबर असल्यामुळें, पळताभुई थोडी झाली. कांहीं वेळांनीं तो फार दमला. अल्लाउद्दिनानें आपली तलवार बाहेर काढली व लगेच जादुगाराचें दोन तुकडे करून टाकलें. राणीला बरोबर घेऊन राजवाडीं परत आला व तो आनंदानें सुखानें आणि मजेंत राहूं लागला.

# जिवावर बेतलें पण गोळीनें वांचलें ! गोष्ट चवथी

नुकतांच सूर्योदय झाला होता. पांखरांचा किलबिलाट चालू होता. निरनिराळ्या तऱ्हेचीं झाडें चोहूंबाजूंला पसरली होती, त्यांच्या मधून लांब अशी एक पायवाट गेली होती. याच वेळीं रंगीबेरंगी कपडे घातलेली एक छोटीशी मुलगी तुरुतुरु चालली होती. तिचे नांव रंगू. रंगूच्या हातांत कसलीतरी एक पिशवी होती. काय बरं होतं त्यांत. गोड गोड खाऊ होता. तो खाऊ कोणाला बरं नेत होती ती? तिला किनई एक होती आजी. ती फार म्हातारी होती. गेले दोन दिवस तिला बारीक बारीक ताप येत होता म्हणून छोटी रंगीबेरंगी रंगू भेटायला चालली होती. तिला फार आनंद झाला होता. आजीला केव्हां भेटेन आणि गोड गोड खाऊ खायला केव्हा देईन असं झालं होतं तिला. ती रस्त्यानें गात गात चालली होती, इतक्यांत एक लांडगा तिला आडवा आला. छोटी रंगीबेरंगी रंगू घाबरली. तिला वाटलं आतां मेला हा लांडगोबा आपल्याला खाणार, गोड गोड खाऊसुद्धां खाणार, आजी आपली वाट पहात असेल. बिचारीला वाटत असेल कीं, मी आतां येईन मग येईन, पण काय उपयोग? लांडगा तर कांही केल्या सोडणार नाहीं. लांडगा जवळ येऊन जोरानं म्हणाला, "काय रंगूताई, एवढ्या सकाळीं कुठें चालल्या नटून थटून.

कांहीं मेजवानी वगैरे आहे वाटतं?" रंगूताई मनाला धीर देत म्हणाली? "छट, मी तर जातेय माझ्या आजीला भेटायला. ती फार आजारी आहे रे, माझी वाट पहात असेल. जातें हं. बरं आहे, नमस्ते." लांडगा गुरगुरत म्हणाला. रंगूताईनें केव्हांच पळ काढला. लांडगोबा तावडतोब एका जवळच्या रस्त्यानें छोटी, रंगीबेरंगी रंगू पोंहचायचें अगोदरच आजीच्या घरांत घुसला. म्हाताऱ्या आजीचे हाल हाल करून केव्हांच त्यानं तिला गट्ट केलं. आणि आतां रंगूताईची वाट पाहूं लागला. कांहीं वेळांनीं रंगूताई घराशीं पोंहचली. धापा टाकीत टाकीत आजी झोंपली होती तिथं आली. आज आजी तिला फारंच लठ्ठ दिसली, आजार आहे. होत असेल कांहीं बाही. हलकेंच मोठ्या लाडांत येऊन ती म्हणाली, "अबब! आजी किती मोठं आहेग तुझं तोंड हें?" "हो बाळ मोठं आहे! फार मोठं आहे. तुला मटकन खाण्याइतकं मोठं आहे." लांडगोबा उडी मारून म्हणाले. रंगीबेरंगी रंगूनें लांडगोबाला आजीच्या कपड्यांत पहातांच धूम ठोकली. लांडगाही पळायला लागला. दोघेही सारखे पळत होते. थोड्याच वेळांनीं रंगूला कसला तरी मोठा आवाज ऐकूं आला. तिनें वळून पाहिले, तों काय एक खाकी कपडे घातलेला शिकारी आपली बंदूक नुकतीच खाली ठेवून उभा होता. रंगूला आश्चर्य वाटलें आणि तिला कमालीचा आनंद झाला, कां माहित आहे तुम्हांला? दुसऱ्याच बाजूला एका मोठ्या वृक्षाखालीं लांडगोबा धाडकन् मरून पडला होता. रंगूताई आ करून बघतच राहिली त्याच्याकडे!

—संकटग्रस्तास साह्य वेळेवर मिळतें; पण संकटांत मात्र आपण देवाला लाखोली वाहतो. तेव्हां काय तेविचार करू-नच करावें नाहीं कां ?

## देवीची दया

गोष्ट पांचवी

त्या राजधानीचें नांव बालनगर होतें. नगरचा राजकुमार लहान होता. तो दिसावयाला फारच सुंदर होता. लहान मुलांमुलींत मोकळ्या मनानें मिसळत असे. मुलांबरोबरच शिकायचा, खेळायचा, हंसायचा नाचायचा आणि खूपखूप गंमत जंमत करायचा. कोणी श्रीमंत ओश्रस कोणी गरीब असो तो सर्वांना सारखाच होता सर्व मुलांमुलींवर जिवापाड प्रेम करीत लाड करीत. त्याचे आजोबा सर्व कारभार पहात असत. त्यांना सुद्धां मुलांची फार फार आवड होती. त्यांच्या मनांत सारखें येई कीं राजकुमाराचं लग्न लहान-पणींच केल्यास सर्वांना किती किती आनंद होईल नाहीं ! हा विचार त्याच्या मनांत येतांच आनंदानें ते नाचत.

राजवाड्या जवळच एक डौलदार घर होतं. तिथं तीन बहिणी राहात असत. थोरलीचें नांव शालिनी, मधलीचें नांव मालिनी आणि धाकटीचें नांव कामिनी होतें. शालिनी व मालिनी रूपानें कुरूप होत्या. स्वभावानें दुष्ट होत्या. त्या कामिनीला फार फार छळत असत. आपलं जेवण तिनेंच करावं, कपडे तिनेंच धुवावें,

केरकचरा काढावा इतकंच काय बुटाचे बंद देखिल तिनेंच बांधावें. कामिनी लहान होती, दिसायला सुंदर होती, स्वभावानें शांत व हुशार होती. तिला रोज वाटे आपण लांब लांब फिरायला जावं, खेळावं, हंसावं, नाचावं, मजामजा करावी, पण कामापुढं घरांतील खिडकीसमोर सुद्धां क्षणभर उभं राहायला वेळ मिळत नसे. शालिनी, मालिनी दिवसभर राजकुमाराकडे जात असत. दोन वेळां जेवायला मात्र न विसरतां घरीं येत. त्यांतून कधीं जेवणाला उशीर झाला कांहीं चुकलं बिकलं तर कामिनीला पुष्कळ रागावत असत आणि मारतही असत. त्यांतल्या त्यांत अलीकडे फारच दुष्टपणा करीत. कारण लवकरच राजकुमाराचं लग्न होणार होतं. कधीं कामिनी बाहेर पडलीं आणि राजकुमारानें चुकून हिला पाहिलें तर हिलाच कशावरून पसंत करणार नाहीं तो. आतां हिनें कुठेंही घराच्या बाहेर जावयाचें नाहीं. नेहमीं घरांत कोंडून ठेवांवयाच्या. त्या तिला भाजीपाला आपणच आणून देत.

कामिनी गरिब होती. तिच्यावरं कोणीही प्रेम करीत नसे. पण देवाचं मात्र प्रेम फार होतं तिच्यावर. ती देवाची रोज प्रार्थना करित असे—"देवा, माझ्यावर दया कर. मी शालुमालूताईचे काय केलंय ? मला कधीं राजकुमाराकडे नेत नाहींत, कुठं फिरायला जाऊं देत नाहींत, सदा घर आणि मी. त्या माझ्यावर रागावल्या म्हणून तूं सुद्धां माझ्यावर रागावलास, रुसलास, फसलास तर मग मला बिलकल चालायंच नाहीं, तूं माझी आई



........सरस्वती तिला प्रसन्न झाली.........

आहेस, वडील आहेस सर्व कांहीं तूंच आहेस, माझ्यावर कृपा कर आणि शालुमालूताईंना चांगली बुद्धि दे."

अिकडे कांहीं दिवसांनीं आजोबांनीं राजकुमाराचें लग्न ठरवलें. लग्नाचे दिवशीं राजकुमारानें कोणतीही मुलगी पसंत करून लग्न करावें असें ठरलें. लवकरच लग्नाचा दिवस उजाडला. शालिनी मालिनीला फार फार आनंद झाला होता. जणुंकांहीं राजकुमार आपल्या दोघींशीं लग्न करील असंच त्यांना वाटत होतं. त्या आज अगदीं पहाटें उठल्या. कामिनीकडून नट्टापट्टा करविला आणि केव्हांच चालत्या झाल्या. कामिनीला वाटलं आज इतका नट्टापट्टा करून कुठं बरं गेल्या असतील? राजकुमाराकडे काय बरं असेल आज! नको. पण आपल्याला त्याचा काय उपयोग, रडत रडत देवासमोर गेली आणि ढळढळा रडूं लागली, "देवा नारायणा, तूं माझ्यावर खरोखर रागावलास काय? मी लहान आहे मला कांहीं समजत नाहीं म्हणून तूं हंसतोस?" इतक्यांत देवी सरस्वती तिला प्रसन्न झाली. देवी प्रेमानें म्हणाली, 'बाळ, कामिनी, इकडे ये, अशी माझ्या अगदीं जवळ ये, घाबरूं नकोस मी तुझी आहे हो! अगदीं खरोखर तुझीच आहे.' आपण कुठें आहो काय पहात आहो असें कामिनीला झालें. धांवत धांवत देवीजवळ गेली. चिमुकल्या हातांनीं डोळे पुसले. नमस्कार करून उभी राहिली. काय बोलावं कांहीं सुचेना देवी म्हणाली 'बाळ आज राजकुमाराचें लग्न आहे. तिथं तूं आतां जा. तुला छान छान कपडे देते, सुंदर दागिने देते आणि कांचेचे बूट देते पण बघ

रात्रीं बारा वाजायचें आंत घरीं परत ये कारण परत तुझें फाटकें तुटकें कपडे परत येतील.' असें म्हणून ती नाहींशीं झाली, इकडे कामिनीचा आनंद गगनांत मावेना, तिच्या अंगावर सर्व भरजरी कपडे चकाकत होते. अंगावरील दागिने आकाशांतील ताऱ्यांना मुद्धां लाजवत होते. धांवत धांवत ती घराचे बाहेर आली. एक सुंदरशी बगी उभी होती, त्यांत बसून ती केव्हांच राजवाड्यांत जाऊन पोहचली. शालिनी आणि मालिनी कामिनीला पहातांच जळफळूं लागल्या; पण राजकुमारादेखत त्यांना कांहींच बोलतां येईना. राजकुमारानें कामिनीला पाहिलें आणि कामिनीनें राजकुमाराला पाहिलें. राजकुमाराला फारच आवडली ती. सर्व मुलांशीं बोलणारा राजकुमार आज कोणाशींही बोलेना. राजकुमार कामिनीला बरोबर घेऊन आपल्या राजमहालांत बसून राहिला. तो सर्वांना विसरला. गाऊं लागला नाचूं लागला अगदीं बेभान झाला होता तो. रात्रीं बाराचा सुमार झाला. कामिनी अगदीं घाबरून गेली. हळूं हळूं राजकुमाराची नजर चुकवून तीं घरीं पळून गेली. राजकुमार तिच्या पाठोपाठ पळूं लागला पण ती त्याला सांपडेना. शेवटीं अगदीं निराश मनानें राजवाड्यांत परत येतांना त्याला एक कांचेचा बूट सांपडला. बूट तिचाच होता.

हा बूट ज्या मुलीचे पायांत बसेल त्याच मुलीशीं मी लग्न करीन असे त्यानें ठरविलें. आजोबांना व शिपायांना बरोबर घेऊन प्रत्येकाच्या घरीं तो जाऊं लागला, कांहीं वेळानें तो कामिनीच्या घरीं येऊन पोंहचला, शालिनी मालिनी यांनीं कामिनीला

आंतल्या खोलींत लपवून ठेविलें व जर हूं का चूं करशील तर खबरदार असें बजावून ठेवलें, राजकुमारानें तो बूट शालिनी मालिनीच्या पायांत घालून पाहिला पण तो नीट बसेना, त्याला वाईट वाटले, तो घराच्या बाहेर जाणार इतक्यांत कामिनीनें हांक मारली. राजकुमारानें वळून प्रथम तो बूट कामिनीचे पायांत घातला आणि तो अगदीं नीटं बसला. राजकुमाराला फार आनंद झाला. कामिनीला सुद्धां फार फार आनंद झाला. त्याच दिवशीं मोठ्या थाटामाटानें त्यांचें लग्न झालें. शालिनी मालिनी मात्र नुसत्या डोळे टवकारून बघतच राहिल्या.

—दैव जें ठरवितें. तेंच घडत असते. माणूस त्या ठिकाणीं कांहीं करूं शकत नाहीं.

# आमचीं प्रकाशनें

१ **विक्रमाचा विक्रम :** लेखिका, सौ. मालती दांडेकर दहा आणे

विक्रमाच्या आयुष्यांत अद्‌भुत आणि अघटित अशा घटना कशा घडल्या आणि त्या सौ. मालतीबाईंनीं अगदीं हळुवार हातानें कशा लिहिल्या हें पुस्तक वाचून तुम्हांला कळेल. पुस्तक हातांतून सोडवणार नाहीं.

२ **निळा दिवा :** दुसरी आवृत्ति लेखिका, शान्ता ज. शेळके बारा आणे

चेटक्या, सावत्र आया आणि निष्ठूर राजे यांनीं लहान मुलामुलींना कोणत्या कोणत्या तऱ्हेनें छळलें आणि त्रास दिला याचीं रसभरीत आणि कारुण्यरसपूर्ण वर्णनें शान्ताबाईंनीं या गोष्टींच्या संग्रहांत फारच सुंदर रितीनीं लिहिलीं आहेत. वाचतांना खूप मनोरंजन होईल.

३ **चढाओढ :** ना. धों. ताम्हनकर. किंमत आठ आणे.

मुलांमुलींनीं शाळेंतल्या चढाओढींत भाग घेऊन तयारी करीत असलेल्या प्रसंगावर या नाटिकेची उभारणी असून खुसखुशींत विनोद, मजेदार गाणीं, यामुळें ही नाटिका समारंभांत करण्यास फारच छान आहे.

४ **यक्ष नगरींतील रम्य कथा**-१-२ सौ. मालती दांडेकर ६-७ आणे

या दोन्ही पुस्तकांत लहान लहान अद्‌भुत रमणीय कथा दिल्या असून त्या बालवाचकांना फार आवडतील.

५ **किशोरकुंज :** संपादक पंडित अनंत कुलकर्णी मूल्य २ रुपये

सुप्रसिद्ध साहित्यिकांनीं मुलांच्यासंबंधीं लिहिलेल्या अकरा गोष्टींचा

हा संग्रह आहे. आरंभी सुंदर रसग्रहण असून सर्व गोष्टींचें मार्मिक विवेचन त्यांत केलें आहे. या गोष्टींत बालजीवनांचें विविध पैलू निरनिराळ्या दृष्टीकोणांतून मांडलें आहेत. हें पुस्तक मुंबई सरकारनें पुरवणी वाचनाकरितां मंजूर केलें आहे.

६ कुंतीचा घांस—वि. वि. बोकील. किंमत सहा आणे

महाभारत मालेंतील हें पहिलें पुष्प. पुरुषांचा पराक्रम प्रभावी होण्यासाठीं आईच्या प्रेमाचा हात त्यांच्या पाठीवरून फिरावा लागतो. जगाला जाळून टाकण्याची भीषण प्रतिज्ञा उच्चारून दाखविणारी पराक्रमीं माणसें आईच्या मांडीवर समाधानानें झोंपी जात असतात. आईची केवळ स्मृति हीच माणसांची मूक भाग-विण्यास समर्थ आहे. हें कसें ? हें पुस्तक वाचलें कीं, समजेल. जरूर वाचा. सुंदर मनोविश्लेषणांनीं हें पुस्तक पानोपान भरलें आहे.

७ मीनाक्षी—शान्ता ज. शेळके. किंमत एक रुपाया

पृथ्वीवरील गंमती तुम्हांला वाचून ठाऊक आहेत, पण समु-द्राच्या अंतरंगांतील गंमती तुम्हांला ठाऊक आहेत कां ? समुद्र जसा अथांग आहे. तशाच त्या गंमतीही अथांग आहेत. त्यांचा आनंद हें पुस्तक वाचून जरूर घ्या. सुंदर, सुंदर वर्णनांनीं हें पुस्तक अत्यंत सुंदर झालें आहे.

८ राजपुत्र अमरेंद्र : पांडुरंग बेणारे. किंमत सहा आणे

" प्रत्येकानें जेवायला येतांना आपापल्या घरांतील चांदीचीं भांडीं घेऊन यावींत. " राजकन्या अलका प्रत्येक गांवीं जाऊन तेथील लोकांना जेवायला बोलावत असे पण जेवायला बोलावतांना

तिची वरील विनंति असे. आणि त्यामुळेंच तिचा पति, तिला परत मिळाला ? कसें तें या पुस्तकांत जरूर वाचा.

**९ विद्यावती व सुकांत :** दत्त एकनाथ सुगांवकर-मुल्य आठ आणे

"बाहेर जा, पराक्रम करा-नांव मान मिळवा आणि भेटीला या." या वहिनीच्या उपदेशाप्रमाणें तो घराबाहेर पडला. आणि परत आला तो युवराज होऊन व राजकन्या मिळवूनच. त्यानें काय केलें ? हें पुस्तक वाचा आणि पहा. आणि तसें तुम्ही करा.

**१० गफूर नजीम व शमीम :** दत्त एकनाथ सुगांवकर. आठ आणे

अरबी भाषेंतील मुख्य गोष्टी लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतात. तशीच ही एक अरबी भाषेंत न आलेली पण सुरस आणि मनोरंजक गोष्ट आहे.

**११ चौकोनी खुंट्या :** ना. धों. ताम्हनकर. चार आणे

ठराविक पुस्तकांतले ठराविक उतारे पाठ म्हणणारे पोपट-मैना आजपर्यंत खूप निर्माण झाल्या. पण यापुढं आपल्याला आपल्या उद्यांच्या हिंदुस्थानाला याहून वेगळ्या वेगळ्या उद्धारकांची गरज आहे. ती कशी भागेल ? ही नाटिका वाचा आणि करून दाखवा. म्हणजे सर्वांनाच कळेल.

**१२ हरताळ :** ना. धों. ताम्हनकर. चार आणे

मुख्य उद्देशाचा उमज न पडल्यामुळें कार्याऐवजीं नुसतां पोरखेळच कसा होतो हें पाहाणें उपयुक्त आहे. म्हणून ही नाटिका अवश्य घ्या.

**१३ गंगावतरण :** वि. वा. जोशी. किंमत आठ आणे

हिंदुस्थान देशाची गंगा व हिमालय हीं दोन भूषणें आहेत.

मग ह्या भूषणांची माहिती तुम्हांला हवींच. गुगिल्या उगम कुठें कसा झाला याची गोष्टीरूप माहिती या पुस्तकांत आहे.

**१४ न यायच्या वाटेवर** : म. भा. भोसले. किंमत बारा आणे

मास्तर मारतात. पण प्रेमही करतात. आणि वळण चांगलें लागतें. अशीच ही गुरुशिष्य प्रेमावर आधारलेली उत्कृष्ट कथा आहे.

**१५ चतुरादेवी** : 'सुधांशु' किंमत बारा आणे

पोरकी चतुरा. चतुरा चुलतीकडे राही. आणि मग तिला जांच व्हायला लागला. कसा ? आणि त्यांतून ती कशी बाहेर पडली : वाचाच हें पुस्तक म्हणजे समजेल.

**१६ सुशीला राणी** : दीनानाथ म्हात्रे. सहा आणे

जादूचा आरसा ! जादूच्या वस्तू म्हटल्या कीं मुलांच्या उड्या तिकडे आधीं पडतात. आणि मग त्यांची भरपूर करमणूक होते. अशाच जादूच्या अनेक वस्तू या पुस्तकांत आहेत. त्यामुळें काय काय झालें हें जरूर पहा. फारच छान पुस्तक आहे.

**१७ चाणाक्ष न्यायाधीश** : कवि यशवंत. चार आणे

तुम्हांला चाणाक्ष म्हणून घ्यायचय् ? मग हें पुस्तक वाचून चाणाक्षपणा जरूर शिका.

**१८ बांसरी** : अनंत मराठे. सहा आणे

गोकुळांतील बांसरीच्या सुराप्रमाणेंच या पुस्तकांतील शब्द आणि गोष्टी वेड लावतील अशी खात्री आहे.

**कुलक[illegible]गार पुणें २.**

IRBK-0108017